महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मुंबई खार (पश्चिम) येथील मधुमेह रुग्णाचा झालेला मृत्यू

(१) १३१०९ (१०-०९-२०२०). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील खार (पश्चिम) येथील श्री. विष्णू पांचाळ हे मधुमेह या आजाराचे रुग्ण असून त्यांचा दिनांक १९ मे २०२० रोजी वा त्यासुमारास वैद्यकीय उपचार न मिळाल्या मुळे मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत मधुमेही रुग्णाची संख्या जास्त असून त्यांच्या उपचारासाठी पर्यायी व्यवस्था नाही,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरात मधुमेह रुग्णासाठी पर्यायी व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) ़नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२२) : (१) श्री. विष्णू आत्माराम पांचाळ हे व्ही.एन. देसाई, सांताक्रुझ (पूर्व) या रुग्णालयाच्या अपघात विभागात दिनांक १९.०५.२०२० रोजी पहाटे ०२.५० वाजता आल्याची नोंद आढळते. सदर रुग्णास कर्तव्यावरील डॉक्टरांनी त्वरीत तपासल्यावर ते मृत असल्याचे आढळले.

सदर घटना कोविड कालावधीत असल्याने त्यावेळच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मृतदेहाचे शवविच्छेदन न करता त्यास मृत्यू दाखला देण्यात आला असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) मुंबईतील मधुमेही रुग्णांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-

• बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख तसेच, उपनगरीय रुग्णालयांमध्ये आणि दवाखान्यांमध्ये मधुमेहविषयक तपासणी, निदान, उपचार व संदर्भसेवा प्रदान करण्यात येत आहेत.

• बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख व उपनगरीय रुग्णालयांमध्ये मधुमेह आजाराकरिता विशेष बाह्यरुग्ण विभाग कार्यरत असून, सर्व उपचार महानगरपालिकेच्या दरात उपलब्ध करुन देण्यात येतात व रुग्णांना आवश्यक असणारी औषधे रुग्णालयांतून पुरविली जातात.

• मधुमेहाकरिता आवश्यक असणाऱ्या बहुतेक चाचण्या मोफत केल्या जातात.

• अनियंत्रित मधुमेहामुळे निर्माण होणारे दृष्टीदोष, किडनीविकार इत्यादी गुंतागुंतीच्या व्याधींवर देखील उपचार करण्यात येतात व रुग्णांना आवश्यक असणाऱ्या आहाराबाबत तसेच सर्व सर्व प्रकारे काळजी घेण्याबाबत समुपदेशन केले जाते.

• पोस्टर्स, होर्डिंग्स, वृत्तपत्र व टी.व्ही. जाहिराती, रेडिओ संदेश, समाज माध्यमांमार्फत विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येतात.

• विशेष तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पिंपरी चिंचवड (जि.पुणे) शहरातील सर्व रुग्णवाहिका ताब्यात घेऊन त्यांचे संकलन करण्याबाबत

(२) ३२३२७ (११-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) शहरात कोविड -१९ च्या वाढत्या प्रादुर्भावावर कोरोना रूग्णांना दवाखान्यामध्ये घेऊन जाणे किंवा विविध डायग्नोस्टिक सेंटर मध्ये घेऊन जाण्याकरता रुग्णवाहिकेची आवश्यकता असतांना रुग्णवाहिका उपलब्ध होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने खाजगी रुग्णवाहिकांचे मालक तासाला १००० ते ३००० रुपयांची मागणी करुन रुग्णांचे आर्थिक शोषण करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोविडमुळे मृत्यू झालेल्यांचे मृतदेह पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने नेमून दिलेल्या विशिष्ट स्मशानभूमीत दहन करण्यासाठी नेले असता मृतांच्या नातेवाईकांना चार ते पाच तास प्रतीक्षा करावी लागत असल्याने रुग्णांचे नातेवाईक व नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत शहरातील रुग्णवाहिकांना परवाना देण्यात येत असल्याने उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातून परवाना देण्यात आलेल्या सर्व खाजगी रुग्णवाहिका ताब्यात घेऊन त्याचे संचलन करण्याबाबत सक्षम यंत्रणा उभारून टोल फ्री हेल्पलाइन सुरू करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी उपप्रादेशिक परीवहन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांना दिनांक २० एप्रिल, २०२१ रोजी लेखी पत्राद्वारे मागणी केली , हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (३०-०९-२०२२) : (१) हे खरे नाही.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड यांच्यामार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची रुग्णालये/दवाखाने/कोविड केअर सेंटर येथे अधिग्रहीत केलेल्या ७३ खाजगी रुग्णवाहिका व वायसीएम रुग्णालयाकडील ११ रुग्णवाहिका अशा एकूण ८४ रुग्णवाहिका महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करण्यात आल्या होत्या.

(२) हे खरे नाही.

श्री. लक्ष्मण पांडूरंग जगताप, विधानसभा सदस्य यांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांना दिलेल्या निवेदनात सदर बाब नमूद आहे. तथापि, अशा आशयाची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) माहे एप्रिल, २०२१ मध्ये कोविड-१९ बाधित रुग्णांच्या मृत्युच्या संख्येमध्ये वाढ झाल्याने नागरीकांना काही स्मशानभूमी/दफनभूमीमध्ये अंत्यविधी करण्याकरीता प्रतिक्षा करावी लागू नये म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत पारंपारिक पद्धतीने दहन करण्याकरीता अतिरिक्त ९ स्मशानभूमी व १ दफनभूमी आरक्षित करण्यात आलेल्या आहेत.

(४) रुग्णवाहिकांना परवान्याच्या अटीतून सूट प्राप्त असल्याने उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड यांच्याकडून परवाना देण्यात आलेला नाही.

तसेच श्री. लक्ष्मण पांडुरंग जगताप, मा. विधानसभा सदस्य, चिंचवड मतदारसंघ, पुणे यांनी त्यांच्या पत्राद्वारे रुग्णवाहिकेच्या संचलनाबाबत सक्षम यंत्रणा उभारण्याची मागणी केली होती.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

विदर्भ व मराठवाड्यास मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक येथील झालेली रस्त्यांच्या दुरावस्थेस कारणीभूत असलेल्यांवर कारवाई होणेबाबत

(३) ३२५६१ (११-०१-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, विदर्भ,कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मराठवाड्यासह राज्यात जुलै व सप्टेंबर,२०२१ मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे रस्त्यांची दुरावस्था होऊन पडलेल्या असंख्य खड्ड्यांमुळे नागरीकांची प्रचंड गैरसोय होणे, मानसिक, शारीरिक त्रास, वाहतुक खोळंबा, वेळेचा अपव्यय याबाबत नागरीकांच्या संतप्त भावनेचा आदर करुन मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि.३० सप्टेंबर २०२१ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत, खड्डे प्रश्नी कामचुकार अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाई करण्याचे तसेच राज्यातील रस्त्यांची दर्जेदार कामे करण्यासाठी कृती आराखडा तयार करणेबाबत संबंधित अधिकारी वर्गास आदेश दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बैठकीतील निर्णयानुसार शासनाने अतिवृष्टीमुळे खड्डे पडून रस्त्याच्या चाळण झालेल्या भागाची पाहणी करुन सादर केलेल्या अहवालाचे निष्कर्ष काय आहेत? असल्यास, त्यानुसार निकृष्ठ काम करणाऱ्या दोषी अधिकारी व कंत्राटदार यांच्याविरुद्ध अद्याप शासनाने कोणती कारवाई केली आहे,

(३) तसेच तात्काळ खड्डे बुझविणे आणि त्यानंतर सदरहू रस्त्याचे काम दर्जेदार करणेबाबत कृती आराखड्यास मंजूरी देणे तसेच नागरीकांना खड्ड्यांविषयी तक्रार करण्यासाठी राज्य शासन व महापालिका यांनी समन्वयाने एक समायक तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार अद्याप शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) अद्याप याबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

श्री. एकनाथ शिंदे (१७-१०-२०२२) : (१) मा.मुख्यमंत्री यांनी दि.२९/०९/२१ रोजी घेतलेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने सचिव (रस्ते) यांनी दि.०४/१०/२०२१ रोजी दृकश्राव्य परिषद बैठक घेऊन सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचनेनुसार रस्त्यांची वेळोवेळी देखभाल दुरुस्ती करण्यात येते.

(२) रस्त्यांवर पडलेले खड्डे वेळोवेळी भरुन रस्ते वाहतुकीकरिता सुस्थितीत ठेवण्यात येत आहेत.

(३) मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची नोंद घेऊन सा.बां.वि अखत्यारितील रस्त्यावरील खड्डयांच्या तक्रार नोंदविण्याकरीता सा.बां.विभागाचे संकेतस्थळ www.mahapwd.gov.in वर नागरिकांनी खडयाविषय लेखी, ई-मेल, दुरध्वनीद्वारे, टोलफ्री हेल्पलाईन, ऑनलाईन तक्रार निवारण प्रणालीद्वारे तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

वारकरी भवनाच्या धर्तीवर मुंबईत डब्बेवाला भवन उभारण्याबाबत

(४) ३२५८३ (१७-०१-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शेखर निकम (चिपळूण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील डब्बेवाल्यांसाठी तत्कालीन नगरसेविका व विद्यमान महापौर यांनी "डब्बेवाला भवन" उभारण्याच्या मुंबई महानगरपालिकेत मांडलेल्या ठरावास मुंबई महानगरपालिकेने एकमताने मंजुरी दिल्यानंतर सदर प्रस्तावास मा.आयुक्त यांनी देखील मान्यता दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात गेल्या तीन वर्षापासून दरवर्षी रुपये १ कोटी इतकी आर्थिक तरतूद करण्यांत येत असून डब्बेवाला भवनासाठी मुंबईत जागा उपलब्ध नसल्याचे कारणास्तव डब्बेवाला भवन उभारण्यांत आले नसल्याने अर्थसंकल्पात दरवर्षी करण्यांत येणारी आर्थिक तरतूद व्यपगत होत असल्याचे दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, डब्बेवाला भवन उभारण्यासाठी तीन वर्षे होऊनही मुंबईत जागा उपलब्ध होत नसल्याने त्याबाबत डब्बेवाला असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी मुंबईत मा.मुख्यमंत्री महोदयांची माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले असल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, वारकरी भवनाचे धर्तीवर मुंबईत डब्बेवाला भवन उभारणार असे मा.मुख्यमंत्री महोदयांनी डब्बेवाला असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना त्याचवेळी आश्वासन दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२२) : (१) दिनांक ०७.०३.२०१९ रोजीच्या महापालिकेच्या सभेत, मुंबईतील वारकरी भवनाच्या धर्तीवर मुंबईच्या डबेवाल्यांसाठी मध्यवर्ती ठिकाणी डब्बेवाला भवन उभारण्याबाबतच्या ठरावाची सूचना आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अभिप्रायासाठी पाठविण्यात आली होती.

सदर ठरावाच्या सूचनेनुसार, महापालिकेच्या प्रचलित अटी व शर्तींच्या अधीन राहून समाज कल्याण केंद्रासाठी आरक्षित असलेल्या इमारतीचा काही भाग डब्बेवाला भवन संस्थेस देता येईल, तसेच भविष्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेस अनारक्षित भूखंड प्राप्त झाल्यास, सदर भूखंडावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ३७ अन्वये सदर भूखंड डब्बेवाला भवनाकरिता आरक्षित करता येऊ शकतो असा प्रस्ताव महापालिकेकडे सादर करण्यात आला आहे व महापालिकेने दिनांक ३०.०९.२०२१ रोजीच्या सभेत सदर प्रस्ताव पुढील विचारासाठी तहकूब केला आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) डब्बेवाला भवन उभारण्याकरिता सन २०१८-१९ मध्ये रु. १० लाख, सन २०१९-२० मध्ये रु. १० लाख, सन २०२०-२१ मध्ये रु. १० लाख आणि सन २०२१-२२ मध्ये रु. १ कोटी इतकी तरतूद करण्यात आली असून, प्रत्यक्ष खर्च निरंक आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३), (४) व (५) मुंबईमध्ये डब्बेवाला भवनासाठी जागा उपलब्ध झाल्यानंतर व उपभोक्ता विभागाच्या प्रस्तावानुसार महापालिका वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडून मंजूर आराखडे प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

वाकी व मनुला (ता.हदगाव,जि.नांदेड) या गावांचा दरवर्षी पावसाळयात संपर्क तुटत असल्याबाबत

(५) ३२७६७ (११-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर) :सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक बांधकाम उपक्रम वगळून) सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाकी व मनुला (ता.हदगाव,जि.नांदेड) या गावांचा दरवर्षी संततधार पाऊस व इसापूर धरणाचे पाणी नदीपात्रात सोडल्याने तालुक्याशी संपर्क तुटत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गावांजवळ ओढा असून तेथे कमी उंचीचा पूल असून तो या गावांचा दळणवळणांचा एकमेव मार्ग आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने या समस्येची गंभीर दखल घेऊन या गावांना पक्का रस्ता व सदरील दोन्ही गावांना दळणवळणासाठी येथील ओढयावर उंच पूल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (०४-१०-२०२२) : (१) होय,हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) प्रश्नांकीत तळणी ते वाकी हा रस्ता शासन निर्णय दि.२२.१२.२०२० अन्वये प्रजिमा-११२ म्हणून दर्जोन्नत झाला आहे.
तसेच तळणी ते मनुला हा ग्रामिण मार्ग दर्जाचा रस्ता असून ग्रा.मा.क्र.-२ असा आहे.
सदर दोन्ही रस्त्यांवर उंच पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

मुक्ताईनगर (ता.रावेर जि.जळगांव) येथील तापी नदीवर पूलाचे बांधकाम मंजूर होऊन निधी प्राप्त होणेबाबत

(६) ३३३२४ (११-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक बांधकाम उपक्रम वगळून)** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर (जि. जळगाव) येथील मतदार संघातील मौजे मेंढोळदे (खडकाचे) ते सुलवाडी, ता.रावेर मधील हतनूर जलाशयाच्या बॅक वॉटर असलेल्या तापी नदीवर पूलाचे बांधकाम मंजूर होऊन निधी प्राप्त होणेबाबत स्थनिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, यांच्याकडे माहे मे, २०२१ सुमारास मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदरच्या कामाकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय?

श्री. रविंद्र चव्हाण (०४-११-२०२२) : (१) होय. हे खरे आहे.
(२), (३) व (४) मागणीकृत पुलाच्या ठिकाणी दोन्ही बाजूकडील रस्ते हे अवर्गीकृत रस्ते आहेत. तसेच मागणीकृत पूल हा हतनूर जलाशयाच्या बुडीत क्षेत्रामध्ये येत आहे. यास्तव सद्यस्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सदर पुलाचे बांधकाम हाती घेता येत नाही.

मुंबई महानगरपालिकेने मुंबईतील नाले सफाई करण्याकरिता २ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रुपये खर्च केल्याबाबत

(७) ३३७०४ (०२-०२-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेने गेल्या २० वर्षामध्ये मुंबईतील नाले सफाई करण्याकरिता २ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रुपये खर्च केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ब्रिमस्टोवॅट प्रकल्प, नाला रुंदीकरण प्रकल्प, पंम्पिग स्टेशन व मुंबई शहरामध्ये पावसाचे पाणी तुंबु नये म्हणून केलेल्या उपाय योजनावर जवळपास ६ हजार कोटी रुपये खर्च केलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईमध्ये पावसाचे पाणी अर्धा तास पडल्यावरही नाले तुंडुब भरुन रस्त्यांवर मोठया प्रमाणात पावसाचे पाणी जमा होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, सदर चौकशीअंती महानगरपालिकेतील नाले सफाई विभागातील संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच मुंबईमध्ये पावसाचे पाणी न साचण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) भौगोलिकदृष्टया मुंबई शहर व उपनगरातील काही भाग भौगोलिक पातळीनुसार सखल भागात वसलेले आहेत. त्यामुळे पर्जन्य जलवृष्टीचे प्रमाण पर्जन्य जलवाहिन्यांच्या पर्जन्य जल वाहून नेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त असल्यास, तसेच अतिवृष्टीच्या वेळी समुद्रात मोठ्या प्रमाणावर भरती आलेली असल्यास सखल भागात पूरसदृष्य परिस्थिती निर्माण होते.

सखल भाग व पाणी तुंबण्याच्या ठिकाणी खबरदारीची उपाययोजना म्हणून आवश्यकतेनुसार पंप कार्यान्वित करण्यात येतात.

मुंबई शहर आणि उपनगरातील अस्तित्वात असलेल्या पर्जन्य जलवाहिनी जाळयांची क्षमता २५ मिमी. प्रतिताशी इतक्या प्रमाणावरच्या पर्जन्यवृष्टीचे पर्जन्य जल वाहून नेण्याच्या क्षमतेची होती. तथापि, ब्रिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत तसेच एम.डब्ल्यू.एच. च्या अभिप्रायानुसार नाल्याच्या करण्यात आलेल्या रुंदीकरण तसेच खोलीकरणानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर पर्जन्य जलवाहिन्यांची क्षमता ५० मिमी. प्रतिताशी एवढया पर्जन्य जलवृष्टीकरिता करण्यात येत आहे. त्यामुळे पावसाळयात पाण्याचा निचरा जलदगतीने होत आहे.

(४) व (५) सन २०१५-१६ या कालावधीतील नालेसफाईच्या कामात झालेल्या अनियमिततेची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून, नालेसफाईच्या कामात झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या आदेशान्वये १४ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यापैकी १ कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या विरुद्ध निलंबनाची कार्यवाही करणे शक्य झाले नाही.

त्यानुसार, पहिल्या टप्प्यामध्ये १३ कर्मचारी व दुसऱ्या टप्प्यामध्ये ८० अशा एकूण ९३ अपचारी कर्मचाऱ्यांवर सर्वंकष चौकशी पूर्ण करण्यात आली असून तद्नुसार एकूण ७० अपचारी कर्मचाऱ्यांवर दंडात्मक शिक्षेचे शिक्षादेश बजाविण्यात आले आहेत. तसेच, २० सेवानिवृत्त अपचारी कर्मचाऱ्यांबाबत त्यांच्या निवृत्ती वेतनातून दंडात्मक शिक्षेची कार्यवाही सुरु आहे. उर्वरित ३ कर्मचाऱ्यांचे दरम्यानच्या कालावधीमध्ये निधन झाले असून त्यांचेबाबत देखील यथोचित आदेश प्राप्त करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच दोन्ही कंत्राटदारांवरही कारवाई करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविल्यानुसार, मुंबईमधील पुरस्थिती कमी करण्याकरिता ब्रिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत प्रस्तावित केलेल्या एकुण ५८ कामांपैकी ४२ कामे पूर्ण झालेली असून १३ कामे प्रगतीपथावर आहेत व उर्वरित ३ कामांच्या निविदा प्रस्तावित आहेत. तसेच, बिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत प्रस्तावित एकुण ८ पर्जन्य जल-उदंचन केंद्रापैकी ६ पर्जन्य जल उदंचन केंद्रे कार्यान्वित झालेली आहेत. उर्वरित २ पैकी माहूल येथील पर्जन्य जल उदंचन केंद्रासाठी भूसंपादनाची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

तसेच, मोगरा येथील पर्जन्य जल-उदंचन केंद्रासाठी निविदा मागविण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली असली तरी जागेच्या मालकीबाबत प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे व न्यायालयाच्या आदेशानुसार केवळ सर्वेक्षण व आराखडे तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(६) नाला रुंदीकरणाच्या दरम्यान प्रकल्पबाधीत झोपड्यांचे सर्वेक्षण, पात्रता व पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्यास होणारा विलंब तसेच पुनर्वसनास होणारा विरोध, उपयोगिता सेवा वळविण्यात येणाऱ्या अडचणी व विलंब, जमीन संपादन करण्यास लागणारा वेळ, विविध शासकीय प्राधिकरणांची ना-हरकत प्रमाणपत्रे इत्यादी कारणांमुळे ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता विलंब होत आहे.

सदर कारणांमुळे सद्य:स्थितीत प्रकल्प पूर्ण होण्यास लागणारा कालावधी निश्चित करता येणे शक्य होणार नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

पुणे महानगरपालिकेने फेरीवाला योजनेची अंमलबजावणी न केल्याबाबत

(८) ३४४५६ (१७-०१-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना टाळेबंदी काळात फेरीवाल्यांना झालेल्या आर्थिक नुकसानीसंदर्भात केंद्र शासनाने फेरीवाल्यांसाठी पंतप्रधान स्वनिधी योजनेअंतर्गत १० हजार रुपये कर्ज योजना सुरु करुन पूर्वीचे कर्ज फेडलेल्या फेरीवाल्यांसाठी सदर योजनेचा दुसरा टप्पा म्हणून २० हजार रुपयांची कर्ज योजना सुरु करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर फेरीवाला योजनेअंतर्गत योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने राज्य शासनाला व राज्य शासनाने सर्व महापालिकांना समन्वयक म्हणून काम करण्याचे आदेश दिले असल्याचे तसेच ही योजना राष्ट्रीयकृत बँका तसेच सहकारी बँका पतसंस्थांनी राबविण्याचेही आदेशित केले असल्याचे त्याचवेळी निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, असे असतांना, पुणे महानगरपालिकेने सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत कोणतीही कार्यवाही करण्याऐवजी महापालिकेचे काही अधिकारी याबाबत एजन्सी नियुक्त करणार असल्याचे तर काही अधिकार फेरीवाल्यांनी थेट बँकेकडे अर्ज करायची असून तेथे काही अडचण आल्यास, महानगरपालिका मार्गदर्शन करेल असे फेरीवाल्यांना सांगण्यात येत असल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, योजना जाहीर होऊन पुणे महापालिकेने कार्यवाही न केल्यामुळे नॅशनल हॉकर्स फेडरेशन, पुणे या संघटनेने केंद्र शासनाकडे तसेच राज्य शासनाच्या समन्वयक यांचेकडे तक्रारी दाखल केल्याचेही माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही न झाल्याप्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

सदर योजनेची अंमलबजावणी करणे कामी बँक प्रतिनिधी, फेरीवाला संघटना सदस्य, क्षेत्रिय स्तरावरील काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना या योजनेचे ऑनलाईन फॉर्म भरण्याबाबत TRAINING देण्यात आले आहे.

या योजनेअंतर्गत फेरीवाला व्यावसायिकांचे ऑनलाईन फॉर्म भरणेकामी प्रत्येक क्षेत्रिय कार्यालय स्तरावर स्वतंत्र यंत्रणा उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच नागरी सुविधा केंद्रावरही सदर योजनेचे काम सुरु करण्यात आले आहे.

पीएम स्वनिधी योजनेअंतर्गत फेरीवाला व्यावसायिकांचे अर्ज भरणे व मंजूर होणेकामी या कार्यालयामार्फत प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयात १. बायोमेट्रिक फिंगर प्रिंट मशीन २. प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयात २ टॅब ३. क्षेत्रिय कार्यालयनिहाय फेरीवाला व्यवसायिकांना माहिती पत्रक वाटण्यासाठी २०,००० माहिती पत्रक देण्यात आले आहे ४. प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयात बँकाचे अडचणी निरसन करणेकामी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करण्यात आले असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्ह्यातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर धम्मदिक्षा येथील दिक्षाभूमीच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(९) ३५००७ (१२-०१-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्मदिक्षा दिलेले व देशातील बौध्द धर्मीयांचे प्रमूख बौध्द तिर्थ स्थळ असलेल्या चंद्रपूर येथील दिक्षाभूमीच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रनिधींनी शासनाकडे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत किती निधी उपलब्ध करुन दिला आहे, तसेच त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती अंतर्गत शासनाने दि.२७.९.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिक्षाभूमी, चंद्रपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन बांधकाम व परिसराचे सुशोभिकरण करणेकरीता रू.१,९८,१५,३००/- इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला असून सदर प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मलकापूर नांदुरा (जि. बुलढाणा)येथे मागासवर्गीय मुला मुलींना
शासकीय वसतीगृहाकरिता निधी उपलब्ध करून देणे बाबत

(१०) ३५१०२ (१२-०१-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर व नांदुरा तालुक्यातील शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय मुलामुलींसाठी वस्तीगृहाच्या इमारतीचा प्रशासकीय मान्यता देण्यात येऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत ची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ ऑक्टोंबर, २०२० रोजी त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) संबंधित वसतिगृहाचे इमारतीचे बांधकामासाठी शासकीय जमीन उपलब्ध करून घेणेबाबतची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

भातसा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील पात्र प्रकल्पग्रस्तांना
मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत घेण्याबाबत

(११) ३५१४२ (१७-०१-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भातसा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील २८ पात्र प्रकल्पग्रस्तांना मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्याबाबत स्थायी समिती व महानगरपालिकेने सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निर्णय घेतला आहे, हे खर आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २ मे २०१६ च्या शासन निर्णयान्वये १९९१ च्या प्रकल्पग्रस्त कुटुंबाच्या व्याख्येत बदल करण्यात आलेला असल्याने परंतु, खापरपणतु व त्याची पत्नी या नात्यापर्यंत प्रकल्पग्रस्त दाखले देय असल्याने वयोमर्यादा संपली म्हणून कुटुंबात नोकरीचा लाभ देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक २ मे २०१६ च्या शासन निर्णयानुसार या २८ प्रकल्पग्रस्तांमधील काही पंतुकडे नाते संबंधातील दाखले आहेत, त्या प्रकल्पग्रस्तांनी नोकरी देण्याबाबत दिनांक ५ ऑक्टोबर, २०२१ रोजी मा.नगरविकास मंत्री व सचिव, नगरविकास विभाग यांनी झूम ऍपद्वारे झालेल्या बैठकीत निर्देश दिलेले आहे,
(४) तसेच सुमारे ६० वर्षे इतक्या विलंबानंतर भातसा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील प्रकल्पग्रस्ताना महानगरपालिका नोकरी देणार असल्याने आधीच विलंब झालेला असून काही प्रकल्पग्रस्तांची वयोमर्यादा उलटून गेले आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेने संपादित केली आहे, अशा प्रकल्पग्रस्तांना महानगरपालिकेच्या सेवेमध्ये सामावून घेण्याबाबतचे धोरण दिनांक ०३.०४.२००८ रोजी मंजूर करण्यात आले आहे.

सदर मार्गदर्शक तत्वामध्ये नामनिर्देशित व्यक्तीसाठी नोकरी देतांना महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम ६ (क) अन्वये कुटुंबाच्या व्याख्येनुसार प्रकल्पबाधीत व्यक्तीचा नातू किंवा नात या नातेसंबंधापर्यंत कुटुंबाची व्याख्या आहे. त्यामुळे प्रकल्पबाधीत व्यक्तीचा नातू किंवा नात या नातेसंबंधापर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेमध्ये सामावून घेण्यात येईल.

यास्तव, खापरपणतु व खापरपणतुची पत्नी यांना महानगरपालिकेच्या सेवेमध्ये नोकरीचा लाभ देय होत नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) ठाणे जिल्ह्यातील भातसा धरणाच्या बुडीत क्षेत्रातील जिल्हाधिकारी (पुनर्वसन) ठाणे जिल्हा यांनी प्रमाणित केलेल्या २८ प्रकल्पग्रस्तांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेमध्ये विशेष बाब म्हणून सामावून घेण्याबाबतचा निर्णय व मार्गदर्शक तत्वे महानगरपालिका ठराव क्र. २३१ दिनांक ०१.१२.२०२० अन्वये मंजूर झालेली आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

जोगेश्वरी मुंबई मधील प्रतापनगर च्या विकासाबाबत व बाधित रहिवाशांचे पुनर्वसन करणेबाबत

(१२) ३५४१३ (०२-०२-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत शिरोमणी गाडगे महाराज मार्ग (जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता) लगत असलेल्या प्रतापनगर हिंदू स्मशानभूमीच्या विकासाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने आवश्यक निधी मंजूर करून या स्मशानभूमीच्या विकासाचे काम सुरु केले आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्मशानभूमीच्या विकास कामामुळे बाधित झालेल्या जवळपास ८२ झोपडीधारकांपैकी केवळ ४० झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले असून उर्वरीत ४२ झोपडीधारक अद्याप पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ४२ स्थानिक संरक्षित पात्र झोपडीधारकांचे शासनाच्या नियमानुसार पुनर्वसन होणे प्रलंबित असल्याने सदरहू स्मशानभूमीच्या विकासाचे काम अद्याप प्रलंबित राहिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ४२ झोपडीधारकांचे पुनर्वसन याच परिसरात करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त निवेदनांच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार या प्रकरणी होत असलेल्या विलंबास जबाबदार असणारे संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करून सदरहू बाधितांचे तातडीने पुनर्वसन तसेच स्मशानभुमीचे विकास काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२२) : (१) हे खरे आहे.

सदर ठिकाणी अस्तित्वात असलेल्या स्मशानभूमीच्या नुतनीकरणाचे/सौंदर्यीकरणाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

(५) मौजे मजास येथील नगर भूक्रमांक २३०, २३२ (भाग), २३३ (भाग), २३४ (भाग), २३५/५३३, २३५/५०५ व २३५/४८४ या भूभागावर विकास नियोजन आराखडा २०३४ नुसार प्रतापनगर हिंदू स्मशानभूमी अस्तित्वात आहे.

सदर अस्तित्वात असलेल्या स्मशानभूमीच्या दक्षिणेकडील लगतच्या स्मशानभूमीकरिता आरक्षित नगर भूक्रमांक २२७ (भाग), २३० (भाग), २३१, २३२ (भाग) व २३३ (भाग) मौजे मजास या भूखंडाच्या संपादनाची प्रक्रिया जिल्हाधिकारी (मुंबई उपनगर जिल्हा) यांचेमार्फत सुरु आहे.

सदर भूखंडाचा ताबा बृहन्मुंबई महानगरपालिकेस मिळाल्यानंतर उर्वरित ४२ झोपडपट्टी धारकांपैकी पात्र

झोपडीधारकांना एम. एम. आर. डी. ए./एस. आर. ए. यांचेकडून सदनिका उपलब्ध झाल्यानंतर प्रस्तावित स्मशानभूमीच्या विकासाचे काम सुरु करण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियोजित आहे.

मिरा-भाईंदर मेट्रो-९ ही दहिसर (पूर्व) ते भाईंदरपर्यंत जाणार असल्याने
या मार्गिकेसाठी कारशेड भाईंदर येथे उभारण्याबाबत

(१३) ३८२३१ (०९-०५-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईदर मेट्रो-९ ही दहिसर (पूर्व) ते भाईदरपर्यंत जाणार असल्याने या मार्गिकेसाठी भाईंदर येथे कारशेड उभारण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाईदरच्या मुर्धा व राई दरम्यानची सुमारे ३२ हेक्टर इतकी जागा एमएमआरडीएने प्रस्तावित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान या कारशेडकरिता संपादित करावयाच्या जागेसाठी स्थानिक ग्रामस्थांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कारशेड उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) मुंबई मेट्रो मार्गिका क्र. ७ साठी आवश्यक असणाऱ्या कारडेपोसाठी जागा उपलब्ध करण्यास अडचणी निर्माण झाल्याने तसेच मेट्रो मार्ग-९ व ७-अ या मार्गिका क्र. ७ चा विस्तार असल्याने मेट्रो मार्ग-९ व ७-अ च्या संरेखनात अंशत: बदल करुन राई-मुर्धे येथे एकूण ३२ हेक्टर क्षेत्रफळामध्ये मार्गिका क्रमांक-७, ७-अ व ९ या तिन्ही मार्गिकांसाठी एकत्रित कारडेपो उभारण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे. यानुषंगाने सदर जागेच्या वापर बदलाबाबत माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झाला असून सद्यस्थितीत सदर प्रस्ताव विचाराधीन आहे.

मुंबईतील झाडांचे अंतर्गत आरोग्य तपासण्यासाठी हॅन्डहोल्ड ट्री रडार
किंवा एमआरआय मशीन विकत घेण्याबाबत

(१४) ३८५५६ (१८-०४-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पावसामुळे व अन्य कारणांमुळे मुंबईत अनेक ठिकाणी वृक्ष पडण्याचे प्रकार वारंवार होत असताना महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाला झाडांचे अंतर्गत आरोग्य तपासण्यासाठी हॅन्डहोल्ड ट्री रडार किंवा एमआरआय मशीन विकत घेण्याचे निर्देश देऊन दोन वर्षे उलटूनही या मशीन आलेल्या नसल्याने झाडांची तपासणी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे झाडे पडण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मशीन्स विकत घेण्याचे निर्देश असतानाही त्या अद्याप खरेदी केल्या नसल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, तातडीने या मशीन खरेदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२२) : (१) झाडांची तपासणी प्रलंबित असल्याची बाब खरी नाही.

सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभागांमध्ये आवश्यक शैक्षणिक पात्रता धारण करणारे १०० हून अधिक अधिकारी झाडांच्या देखरेखीकरिता नियुक्त केले असून, त्यांचेमार्फत झाडांची नियमित तपासणी व देखभाल केली जाते.

याव्यतिरिक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रायोगिक तत्वावर “डी” विभागामध्ये तज्ञ आर्बोरिस्ट यांचेमार्फत अद्ययावत व आधुनिक मशीन, यंत्र/सामुग्री वापरुन झाडांची तपासणी करुन घेण्यात आली आहे.

तसेच स्थानिक पातळीवर नियमितपणे कार्यरत असणारे महानगरपालिकेच्या उद्यान विभागाचे अधिकारी, कर्मचारी व पर्यवेक्षक या सर्वांना “आर्बोरिस्ट” (वृक्षतज्ञ) यांचेमार्फत दिनांक ११.०५.२०२२ रोजी प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देण्यात आले आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) झाडांचे अंतर्गत आरोग्य तपासणी करण्यासाठी ट्री रडार, एमआरआय मशीन किंवा तत्सम आधुनिक उपकरणे बृहन्मुंबई महानगरपालिका स्तरावर उपलब्ध करण्यासाठी विद्युत व यांत्रिकी विभागामार्फत कार्यवाही सुरु करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर उपकरणे तातडीने उपलब्ध होण्यासाठी कार्यवाही सुरु आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

मराठी नवकाव्याचे प्रवर्तक बा.सी.मर्ढेकर यांच्या स्मारकाचे लोकार्पण करण्याबाबत

(१५) ३८८८१ (२८-०३-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मर्ढे (जि सातारा) या गावी मराठी नवकाव्याचे प्रवर्तक बा.सी.मर्ढेकर यांच्या स्मारकाचे काम माहे २०१२ मध्ये वा त्यादरम्यान पूर्ण झाले असल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय

(२) सदरील स्मारकाचे काम पूर्ण झालेले असताना देखील अद्यापही लोकार्पण झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदरील स्मारकाचे लोकार्पण होण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत

श्री. एकनाथ शिंदे (२७-१०-२०२२) : (१) होय

(२) होय

(३) कविवर्य बा.सी.मर्ढेकर यांचे स्मारकाची बाहय व अंतर्गत रंगरंगोटी,सरंक्षक भिंत, गेट, फर्निचर तसेच कविवर्य बा.सी.मर्ढेकर यांचे तैलचित्राचे कामकाज अपूर्ण असून वाढीव अनुदानासाठी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता होवून उक्त नमूद काम पूर्ण करणेचे कामकाज युद्ध पातळीवर सुरु आहे. कविवर्य बा.सी.मर्ढेकर यांचे स्मारक अद्याप ग्रामपंचायत, मर्ढे यांचेकडे हस्तांतरीत करणेत आलेले नाही.

उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेतील तत्कालीन नगररचनाकार यांनी बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र व नकाशातील बनावट स्वाक्षरी असल्याबाबत

(१६) ३९२७१ (१८-०४-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेतील सन २०१६ पासून बेपत्ता असलेले तत्कालीन नगररचनाकार श्री. संजीव करपे यांची बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र व नकाशातील बनावट स्वाक्षरी असल्याबाबत दिनांक १ मार्च, २०२० रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने स्वाक्षरी योग्य आहे किंवा नाही याची पडताळणी करण्याकरीता केंद्रीय न्यायवैद्यकीय प्रयोगशाळा, पुणे यांना यांना दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्रान्वये शासनास पडताळणी अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच अहवाल प्राप्त झाला नसल्यास, या प्रकरणाची गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२२) : (१), (२), (३) व (४) मागील अनेक वर्षांपासून बेपत्ता असलेले उल्हासनगर महानगरपालिकेतील तत्कालीन नगररचनाकार श्री. संजीव करपे यांची बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र व नकाशावरील स्वाक्षरी बनावट असल्याबाबत दिनांक ०१.०३.२०२० रोजी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, नगररचनाकार श्री. संजीव करपे यांची स्वाक्षरी योग्य आहे किंवा नाही याची पडताळणी करुन पडताळणीचा अहवाल सादर करणेबाबत केंद्रीय न्यायवैद्यकीय प्रयोगशाळा, पुणे यांना दिनांक १८.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य व आवश्यक कारवाई करण्यात येईल असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

पालम (जि.परभणी) तालुक्यातील शासकीय विश्रामगृहाचे बांधकाम करण्याबाबत.

(१७) ३९४४९ (१९-०४-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालम (जि.परभणी) तालुका पेठशिवणी येथे नवीन शासकीय विश्रामगृहाची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालम तालुक्यामध्ये अनेक महत्त्वाच्या व्यक्ती व लोकप्रतिनिधींचा शासकीय कामानिमित्त दौरा व ये-जा सुरु असते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पालम तालुक्यात सर्व सोयीसुविधा नसल्यामुळे लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी कर्मचारी यांची मोठी गैरसोय होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पालम तालुक्यातील पेठशिवणी येथे शासकीय जागेत विश्रामगृह बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (गंगाखेड) यांनी मा.सचिव (रस्ते), व मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, औरंगाबाद, अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, नांदेड यांना दि.२२ जून, २०२० रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासकीय जागेमध्ये शासकीय विश्रामगृह उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-१०-२०२२) : (१) पेठशिवणी जि.परभणी येथे शासकीय विश्रामगृहाची आवश्यकता नाही तथापि, पालम हे तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे तेथे विश्रामगृहाची आवश्यकता आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) पालम या तालुक्याच्या ठिकाणी शासकीय विश्रामगृह नसल्यामुळे काही प्रमाणात गैरसोय होते.
(४) होय, हे खरे आहे.
(५) पालम या तालुक्याच्या ठिकाणी विश्रामगृहासाठी शासकीय जागा उपलब्ध नाही. जागा उपलब्ध झाल्यावर या ठिकाणी शासकीय विश्रामगृह उभारण्याचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

लोअर परळ (मुंबई) येथील मे. टुरिझम फायनान्स कार्पोरेशन ऑफ इंडिया या कंपनीने कॉक्स ॲण्ड किंग्स या कंपनीला दीर्घ मुदतीचे कर्ज परत न केल्याबाबत

(१८) ३९६७३ (०७-०४-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी): सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोअर परळ (मुंबई) येथील मे. टुरिझम फायनान्स कार्पोरेशन ऑफ इंडिया या कंपनीने कॉक्स ॲण्ड किंग्स या

कंपनीला माहे डिसेंबर, २०११ ते जानेवारी, २०१९ या कालावधीत दिलेले १० कोटी ४८ लाख रुपयांचे दीर्घ मुदतीचे कर्ज परत न केल्याने सदरहू फायनान्स कंपनीने एन.एम.जोशी मार्ग पोलीस ठाण्यात कॉक्स ॲण्ड किंग्स यांच्यासह ६ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कंपनीने यापूर्वी एस बँक, लक्ष्मी विलास बँक, HDFC बँक, इंडस्इंड बँक आदि बँकांकडून सुमारे २ हजार ५०० कोटी रुपयांचे कर्ज घेऊन आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेतर्फे सदरहू प्रकरणाचा तपास सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणात एन.एम.जोशी मार्ग पोलीस ठाणे अधिकारी आणि आर्थिक गुन्हे विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे चौकशी करुन संबंधित कंपनीच्या विरोधात दोषारोप पत्र मा.न्यायालयात सादर करुन व दोषींना अटक करुन आणि कंपनीची मालमत्ता जप्त करुन फायनान्स कंपनीला कर्ज अदा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०२२) : (१) होय, कॉक्स ॲण्ड किंग्स लि. कंपनीचे पदाधिकारी यांनी संगमनताने मे. टूरिझम फायनान्स कार्पोरेशन ऑफ इंडिया लि., कडून फेब्रुवारी २०१७ ते जुन, २०१९ या कालावधी मध्ये बनावट ताळेबंद सादर करुन दिर्घ मुदतीचे कर्ज घेऊन त्याची विहीत मुदतीत परतफेड न करता रु. ११० कोटी ४८ लाख रक्कमेचे नुकसान केल्याने एन.एम.जोशी मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद आहे.
(२) व (३) कॉक्स ॲण्ड किंग्स लि. कंपनीचे विरुद्ध फसवणूक केल्याप्रकरणी बँकिंग विभाग, आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे १० गुन्हे नोंद आहेत.
तसेच कॉक्स ॲण्ड किंग्स लि. कंपनीचे संचालक, कंपनीचे सी.ई.ओ. व कंपनीचे इंटरनल ऑडीटर यांच्या विरुद्ध नोंदविण्यात आलेले सात गुन्ह्यांमध्ये मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून इतर गुन्ह्यांचा तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा जिल्हयात रमाई घरकुल आवास योजनेतंर्गत बांधून देण्याबाबत

(१९) ३९९९७ (०९-०४-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रमाई घरकुल निर्माण जिल्हास्तरीय समिती (ग्रामीण) ची बैठक सातारा येथे पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक.२४ जानेवारी,२०२२ रोजी वा त्या सुमारास घेण्यांत आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी या बैठकीत २०२१-२२ यावर्षी घरकुल आवास योजनेअंतर्गत ८३५ घरकुलांना मंजुरी देण्यांत आली असून या घरकुलांसाठी १० कोटी २ लाख रुपये इतका खर्च करण्यांत येणार आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास,अनुसूचित जातीच्या नागरिकांना त्यांच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे घर बांधता येत नसल्यामुळे रमाई घरकुल आवास योजनेतून शासनातर्फे त्यांना घर बांधून देण्याच्या बांधकामास केव्हा सुरुवात करण्यांत येणार आहे,
(४) असल्यास, गरजु नागरिकांना घरकुल आवास योजनेंतर्ग घर बांधुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२२) : (१) हे खरे आहे
(२) हे खरे आहे.
(३) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सातारा व सातारा जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी,पंचायत समिती यांना सदर घरकुलांच्या बांधकामासाठी कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) रमाई आवास योजना (ग्रामीण) करिता सन २०२१-२२ मध्ये मार्च,२०२२ अखेर पर्यंत शासनाने रू.५६२.५० कोटी इतका निधी उपलब्ध करून दिला असून सन २०२२-२३ मध्ये आजतागायत रू.२१०.०० कोटी इतका इतका निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. उपरोक्त निधी राज्य व्यवस्थापन कक्ष यांचेकडे उचित कार्यवाहीस्तव वर्ग करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

आमगाव (जि.गोंदिया) रावनवाडी-बिर्सी-कामठा-आमगाव रस्त्याच्या रस्ता रुंदीकरण व सुधारणा करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(२०) ४०९०० (३०-०३-२०२२). श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आमगाव (जि.गोंदिया) रावनवाडी-बिर्सी-कामठा-आमगाव रस्ता रा.मा.३६५ हा महत्वपुर्ण रस्ता असुन या रस्त्याला महत्वाची स्थळे जोडलेली असून सदरील रस्ता तयार करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्व.बांधकाम मंत्री महोदयांना दिनांक १४ जोनवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रस्तावित रस्ता रुंदीकरणासह सुधारणा करण्यासाठी रुपये १६७.२२ कोटी चा प्रस्ताव दिनांक २५ जून, २०२० रोजी विभागीय कार्यालयाकडून सादर करण्यात आलेला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी आमगाव (जि.गोंदिया) रावनवाडी-बिर्सी-कामठा-आमगाव रस्ता रा.मा.३६५ हा महत्वपुर्ण रस्त्याच्या रुंदीकरण व सुधारणा करण्याबाबत आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (११-१०-२०२२) :(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर रस्त्याचे काम हे आशियाई विकास बँक योजनेंतर्गत प्रस्तावित असून आशियाई विकास बँकच्या अर्थसहाय्याने करावयाच्या कामांची यादी अद्याप अंतीम करण्यात आलेली नाही.
(३) व (४) आशियाई विकास बँक योजनेंतर्गत कामे समाविष्ट करतांना जागेची उपलब्धता ,अतिक्रमण मुक्त लांबी, वन विभाग व पर्यावरण विभागाची परवानगी आवश्यकता नसणे,रस्त्यावरील वाहतूक वर्दळ,पर्यटन/धार्मिक स्थळे, दारिद्रय निर्देशांक इ.निकषांचा विचार करण्यात येतो.सदर काम हे या निकषांच्या तपासणीनंतर प्रकल्पांतर्गत समाविष्ट झाल्यास प्राधान्यक्रम व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

मुंबईतील कुर्ला येथील कृष्णा लाल मारवाह मार्गावरील मारवाह पुलाचे काम विनानिविदा देण्यात आल्याबाबत

(२१) ४१२८५ (२५-०४-२०२२). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कुर्ला येथील कृष्णा लाल मारवाह मार्गावरील पिकनिक हॉटेल जवळील सात मीटर रुंदीचा मारवाह पुलाचे ९ कोटी ६६ लाख रुपयांचे काम विनानिविदा कुर्ला-कलीना मिठी नदी पुलाचे काम करणाऱ्या कंत्राटदारास देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुर्ला एल विभागातील कुर्ला-कलिना रस्त्यावर मिठी नदीवरील अस्तित्वात असलेल्या पुलाच्या रुंदीकरण कामाचे कंत्राट दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी देण्यात आल्यानंतर सदरहू काम १९ महिन्यांत म्हणजेच माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये पुर्ण होणे अपेक्षित असतांना, एक वर्षाचा कालावधी पुर्ण होऊन देखील सदरहू काम पुर्ण झाले नसून, त्याच कंत्राटदारांला विनानिविदा आखणी एक काम देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू काम कोणत्या निकषावर उक्त कंत्राटदारांना देण्यात आले आहे, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) सदर कामाचा कार्यादेश माहे एप्रिल, २०१८ मध्ये देण्यात आला असून, वाहतुक पोलीसांची परवानगी माहे जानेवारी, २०१९ मध्ये मिळाली आहे.

सदर काम सुरु केल्यानंतर विमानतळ प्राधिकरणाने गर्डर लॉन्चिंग करण्यासाठी क्रेन वापरण्यास मनाई केल्यामुळे सदर गर्डर्स जागेवर बनविण्यात येत आहेत. तसेच कोरोनाच्या महामारीमुळे सदर कामाच्या प्रगतीवर परिणाम झाला.

कुर्ला-कलिना पुलाच्या कामातील १६ पी.एस.सी. गर्डरपैकी १२ गर्डर लॉन्चिंगचे काम पूर्ण झाले आहे. तसेच, १२६ मीटर डेक स्लॅबपैकी ६३ मीटर डेक स्लॅबचे काम पूर्ण झाले आहे. पुलाच्या लालबहादूर शास्त्री मार्गाकडील पुलाच्या पोहोच मार्गाचे काम सुरु आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) व (४) मारवाह पुलाचा काही भाग खचल्यामुळे सदर पूल वाहतुकीकरिता बंद ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर परिसरातील होणाऱ्या वाहतुक कोंडीमुळे सदर पुलाची त्वरीत पुनर्बांधणी करण्याकरिता सदर काम विनानिविदा कुर्ला-कलिना मिठी नदीच्या पुलाच्या कामाच्या कंत्राटदारास देण्यात आले आहे. तसेच, आजमितीस मारवाह येथील पुलाच्या पुनर्बांधणीचे काम प्रगतीपथावर आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

पुणे महानगरपालिकेच्या टीव्ही खरेदीत झालेला गैरव्यवहार

(२२) ४१५३१ (२५-०४-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडून ३२ इंची टीव्ही खरेदी करण्याच्या कामात मोठ्या प्रमाणत गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२२) : (१) हे खरे नाही.

परंतु याबाबत दि.२६/०८/२०२० रोजीच्या दै. लोकमत वृत्तपत्रामध्ये टीव्ही खरेदी बाबत बातमी छापून आलेली आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुक्ताईनगर , बोदवड व रावेर (जि.जळगांव) या तालुक्यांतील घरकुलांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत.

(२३) ४२५२७ (०९-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर , बोदवड व रावेर (जि.जळगांव) या तालुक्यांत एकूण १७४ गावांपैकी मुक्ताईनगर तालुक्यातील ८२ गावातील बहुसंख्य अनुसूचित जातीच्या बांधवांसाठी रमाई घरकूल योजनेअंतर्गत किमान ५०० घरकूलांचे उद्दीष्ट आवश्यक असतांना येथे केवळ १५० कुटुंबियांना घरकुल योजनमध्ये समाविष्ट केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील योजनेचे किमान ५०० घरकुलांचे चे उद्दीष्ट मिळावे अशी मागणी होत आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२२) : (१) हे खरे नाही.
सन २०२०-२१ व सन २०२१-२२ मध्ये मुक्ताईनगर, बोदवड व रावेर या तालुक्यांकरीता एकूण ८६० इतके उद्दीष्ट मंजूर करण्यात आले आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) सन २०२२-२३ मध्ये मागणीनुसार उद्दीष्ट वाढविण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुबंई येथील कूपर रुग्णालयातील कॅथ लॅब यंत्रणा सुरू करण्याबाबत

(२४) ४२६५२ (२५-०४-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील हदयविकाराच्या रुग्णांना संजीवनी ठरणारी कूपर रुग्णालयातील कॅथ लॅब तयार असूनही बंद असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे मुंबई उपनगरातील रुग्णांचे हाल होत असूनही त्यांना खासगी वा पालिकेच्या सायन येथील लोकमान्य टिळक तसेच परळ येथील केईएम इस्पितळात जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सदर कॅथ लॅब यंत्रणा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०२२) : (१), (२) व (३) कुपर रुग्णालयात सन २०१५ मध्ये हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यात आल्यानंतर, तेथे नव्याने कॅथलॅब उभारण्यासाठी दिनांक २०.१०.२०१५ रोजी आदेश प्राप्त झाले.

तद्नंतर सदर प्रयोगशाळेत परदेशी बनावटीचे उपकरण दिनांक ३०.०३.२०१९ रोजी व त्या उपकरणाची भारतीय साधनसामुग्री दिनांक ०२.०४.२०१९ रोजी उपलब्ध झाली. तथापि कुपर रुग्णालयात जागेची कमतरता असल्यामुळे प्रयोगशाळा सुरु करण्यासाठी लागणारी जागा व आवश्यक असलेले मनुष्यबळ उपलब्ध नव्हते. तसेच, माहे मार्च, २०२० ते ऑगस्ट, २०२१ या कालावधीतील कोरोना महामारीमुळे सदर कॅथलॅब सुरु करण्याच्या अनुषंगाने पुढील कामे रखडली.

सदर कॅथलॅब सुरु करण्यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ उपलब्ध झाल्यानंतर सदर कॅथलॅबचे निर्जंतुकीकरण व कॅथलॅबमध्ये काम करणाऱ्या डॉक्टरांची पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत नोंदणी झाल्यानंतर दिनांक १९.०२.२०२२ पासून कॅथलॅब कार्यान्वित करण्यात आले आहे.

सदर रुग्णालयातील कॅथलॅब कार्यान्वित नसल्याकारणाने सदर रुग्णालयातील काही रुग्णांना आवश्यकतेनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. रुग्णालय, सायन रुग्णालय किंवा नायर रुग्णालयात पाठविले जात होते. तथापि कुपर रुग्णालयातून या रुग्णांना खाजगी रुग्णालयात पाठविलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत

(२५) ४३५५२ (१८-०४-२०२२). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उच्च न्यायालयाने आठ महानगरपालिका तसेच नगरविकास विभागाची अनधिकृत बांधकामाबाबत माहिती सादर न केल्याप्रकरणी माहे मार्च ,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन केले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वांद्रे शासकीय वसाहतीच्या एकूण क्षेत्रफळापैकी किती क्षेत्रफळावर अतिक्रमण झाले व कधीपासून झाले याची यादी शासन सादर करणार आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अतिक्रमणासाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-१०-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) (३) व (४) वांद्रे शासकीय वसाहतीच्या भूखंडावर असलेली अतिक्रमणे हटविणे, अनधिकृत राहणा-या व्यक्तींचे निष्काशन करुन भूखंड नियोजनबध्दरित्या मोकळा करणे यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, दि.१२.०३.२०२० अन्वये उपजिल्हाधिकारी समकक्ष मालमत्ता अधिकारी हे एक पद निर्माण करण्यात आले आहे. या पदावर उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिका-याची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचेमार्फत वांद्रे वसाहतीच्या भूखंडावर असलेल्या अतिक्रमणांचे सर्वेक्षण प्रगतीपथावर आहे. सदर भूखंडावर झालेल्या अतिक्रमणांवर बांधकाम विभागाकडून वेळोवेळी अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही करण्यात येते. सन २०२१-२२ मध्ये ५ वेळा विविध अतिक्रमणांवर अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही करण्यात आली आहे.

उमरेड ते मालेवाडा (ता.उमरेड, जि. नागपूर) रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

(२६) ४३७०६ (१८-०४-२०२२). श्री.राजु पारवे (उमरेड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरेड ते मालेवाडा (ता.उमरेड, जि. नागपूर) रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उमरेड ते मालेवाडा या रस्त्याचे काम पूर्ण झाले असून बांधकामात वापरण्यात आलेले साहित्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

श्री. रविंद्र चव्हाण (२८-०६-२०२२) : (१), (२) व (३) सदर काम प्रगतीत असतांना कामाची गुणवत्ता राखण्यासाठी विविध चाचण्या वारंवारीतेनुसर घेण्यात येऊन काम पूर्ण करण्यात आले आहे. तथापि विषयांकित रस्त्यावर काही ठिकाणी पडलेल्या भेगा हया सदर रस्त्यावर Overload Trucks चा वापर जास्त असल्यामुळे Unequal Settlement होऊन भेगा पडल्याचे निदर्शनास येते. यास्तव सदर कामाचे तांत्रिक मूल्यमापन, केंद्रिय सडक अनुसंधान संस्था,नवी दिल्ली (CRRI) यांचेकडून करण्याचे प्रस्तावित असून त्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
तसेच सदर कामाचा देखभाल दुरुस्तीचा कालावधी सुरु असून तो १० वर्षाचा असल्याने कंत्राटदाराच्या स्वखर्चाने भेगा पडलेली कॉंक्रिट पॅनेल्स तोडून सदर ठिकाणी नव्याने कॉंक्रिटीकरण करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

’सावली’ इमारतीतील कर्मचाऱ्यांप्रमाणे अन्य ठिकाणी शासकीय निवासस्थानात रहात असणाऱ्या कर्मचाऱ्यांना घरे देण्याबाबत

(२७) ४४०११ (१८-०४-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तत्कालीन मुंबई विकास विभागाने (बी.डी.डी.) सन १९२१-१९२५ च्या दरम्यान वरळी, मुंबई येथे बांधलेल्या चाळींचा पुनर्विकास करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून बी.डी.डी. चाळीतील सेवानिवासस्थानामध्ये रहात असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना पुनर्विकासानंतर मालकी तत्वावर बांधकाम खर्चाची रक्कम आकारून ५०० चौ.फू.क्षेत्रफळाची घरे देण्याचा निर्णय माहे, ऑगस्ट, २०२१ मध्ये घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बी.डी.डी. चाळीच्या परिसरात असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या "सावली" या इमारतीचा पुनर्विकास बीडीडी चाळीतील पोलीस सेवानिवासस्थानातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून "सावली" इमारतीमधील वास्तव्यास असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना मालकी तत्त्वावर घरे देण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईमधील शासकीय कर्मचाऱ्यांची सर्वात मोठी वसाहत असलेली वांद्रे शासकीय वसाहत तसेच वरळी, मुलुंड, विद्याविहार, मालाड, पवई या ठिकाणी सरकारी निवासस्थानात राहणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांकडून मालकी हक्काने घरे मिळण्यासाठी मागणी होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याच निर्णयाच्या धर्तीवर अन्य ठिकाणी शासकीय निवासस्थानात राहणाऱ्या उपरोक्त शासकीय कर्मचाऱ्यांना मालकी हक्काने घरे देण्याच्या संदर्भात शासनाची कोणती भूमिका आहे,
(५) असल्यास याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) तत्कालिन मुंबई विकास विभागाने (BDD) सन १९२१-२५ च्या दरम्यान मुंबईतील वरळी, नायगांव, ना.म.जोशी मार्ग व शिवडी येथे एकूण २०७ चाळी बांधल्या आहेत. सदर चाळी खूप जुन्या झालेल्या असल्याने त्यांचा पुनर्विकास करण्याचा निर्णय गृहनिर्माण विभागाच्या दि.३०.३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

सदरहू प्रश्नामध्ये नमूद केलेल्या विविध ठिकाणच्या शासकीय सेवा निवासस्थानात राहणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या शासकीय सेवानिवासस्थानांचा पुनर्विकास करून त्यांना बी.डी.डी. चाळीमध्ये बांधकाम खर्चाची रक्कम आकारून मालकी तत्त्वावर घरे देण्याची विनंती विविध अर्जांद्वारे या विभागास केली आहे.

तथापि, या सर्व अर्जदारांना शासकीय नियमानुसार सेवा निवासस्थानांचे वाटप करण्यात आले आहे. ते बी.डी.डी. चाळीतील भाडेकरू नाहीत. त्यामुळे त्यांना बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासांतर्गत पुनर्वसन गाळा अनुज्ञेय ठरत नाही. तसेच बी.डी.डी. चाळीतील ज्या इमारतीमध्ये सेवा निवासस्थाने आहेत त्यांचा पुनर्विकास झाल्यानंतर तेवढी पुनर्विकसित सेवा निवासस्थाने संबंधित प्रशासकीय विभागांना उपलब्ध करुन देण्याचा निर्णय उक्त दि.३०.३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यामुळे या अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांना बी.डी.डी. चाळ पुनर्विकास प्रकल्पामध्ये बांधकाम खर्च आकारून मालकी हक्काची घरे देण्याचे धोरण शासनाने अवलंबिल्यास बी.डी.डी. चाळी पुनर्विकास प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य होणार नाही. या सर्व बाबी विचारात घेऊन बी.डी.डी. चाळ पुनर्विकास प्रकल्पात अपात्र शासकीय कर्मचाऱ्यांना सेवा निवासस्थानाच्या बदल्यात मालकी हक्काने घरे देण्याची विनंती अमान्य करण्यात आली आहे.

औसा (जि.लातूर) येथील शासकीय निवासस्थान बांधकामाबाबत

(२८) ४४४६८ (१९-०४-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातूर) येथील शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी निवासस्थान नसल्याने जवळपास सर्वच अधिकारी व कर्मचारी हे मुख्यालयात रहात नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी औसा येथे अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी शासकीय निवासस्थान बांधकाम करण्याबाबत विधानसभा अधिवेशनात तसेच सन २०१९ ते आजतागायत जिल्हाधिकारी कार्यालय व तहसील कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने शासनास प्रस्ताव सादर केला आहे काय,
(३) असल्यास, सदरील शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थान बांधकामसाठी किती निधीची आवश्यकता असून निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-१०-२०२२) : (१) होय, औसा (जि.लातूर) येथील शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी शासकीय निवासस्थान बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली आहे.
(२) शासकीय निवासस्थानासाठी आवश्यक असणा-या जागेबाबत महसूल विभागाकडे मागणी करण्यात आली आहे. जागा उपलब्ध झाल्यावर निवासस्थान बांधकाम करण्याचे नियोजन आहे.
(३) व (४) शासकीय निवासस्थान बांधकामासाठी आवश्यक असणारी जागा उपलब्ध झाल्यावर बांधकामाच्या आवश्यकतेनुसार अंदाजपत्रके तयार करुन पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गाच्या धर्तीवर मुंबई-सिंधुदुर्ग महामार्गा बांधण्याबाबत

(२९) ४४८८८ (२०-०९-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गाच्या धर्तीवर मुंबई-सिंधुदुर्ग महामार्ग बांधण्यात येणार असून त्याच्या डिपीआर (तपशीलवार प्रकल्प अहवाल) तयार करण्याचे काम सुरू आहे, अशी माहिती मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांनी दिली आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महामार्गा बांधणी बाबतचा डीपीआर तयार करण्याचे काम पूर्ण झाले आहे काय,
(३) नसल्यास, सदर काम पूर्ण ना होण्याची कारणे काय आहेत ,
(४) तसेच सदर डीपीआर तयार करण्याचे काम साधारणपणे कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे?

श्री. एकनाथ चव्हाण (०४-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत प्रगतीपथावर आहे.
(४) सदर सविस्तर प्रकल्प अहवाल जून, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

पालघर जिल्ह्यातील वसई-विरार शहर आणि परिसरातील आरोग्य व्यवस्था सुधारण्याबाबत

(३०) ४५३५२ (२५-०९-२०२२). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील वसई-विरार पालिकेअंतर्गातील आरोग्य विभागात तज्ञ वैद्यकीय अधिकारी आणि सोयी-सुविधांचा अभाव असल्यामुळे नागरिक मोफत वैद्यकीय सुविधेपासून वंचित राहत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तावित असलेली रुग्णालयांची कामे प्रलंबित असल्याने तसेच आरोग्य केंद्राची झालेली दुरावस्था यामुळे सर्वसामान्य नागरिकांना गैरसोईला सामोरे जावे लागत असल्याची बाब दिनांक ६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी पालिका प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, वसई-विरार शहर आणि परिसरातील आरोग्य व्यवस्था सुधारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-११-२०२२) : (१), (२), (३) व (४) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत ७ रुग्णालये, २ माता बाल संगोपन केंद्रे, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व ३ दवाखाने यांच्यामार्फत नागरिकांना मोफत आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.

वसई-विरार शहर महानगरपालिकेकडून प्राप्त आकडेवारीनुसार वसई-विरार शहर महानगरपालिका रुग्णालयात मागील वर्षात सुमारे ४.२२ लक्ष बाह्य रुग्णांनी वैद्यकीय सेवेचा लाभ घेतला होता. तसेच विविध आंतररुग्ण विभागामध्ये

अंदाजित १२,७२१ रुग्ण दाखल झाले होते. तसेच महानगरपालिकेकडून उपलब्ध आकडेवारीनुसार अंदाजित ६६३१ शस्त्रक्रिया रुग्णालयात करण्यात आल्या आहेत.

तथापि, महानगरपालिका क्षेत्रातील आरोग्य सुविधेच्या अनुषंगाने काही तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत ९३४ वैद्यकीय अधिकारी व इतर तज्ञ कर्मचारी कंत्राटी तत्वाने कार्यरत असल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

दरम्यान महानगरपालिका स्तरावर वित्तीय वर्ष सन २०२२-२३ मध्ये आरोग्य विभागासाठी रु. १०७.६० कोटीची तरतुद करण्यात आली आहे. महानगरपालिकेमार्फत १२ आरोग्य वर्धिनी केंद्रे व आचोळे, नालासोपारा पूर्व येथे ३०० खाटांचे नवीन रुग्णालय प्रस्तावित आहे. तसेच एआरटी सेंटर करीता महानगरपालिकेस मान्यता मिळाली असून सदरचे केंद्र लवकरच कार्यान्वित करण्यात येईल असे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्हयातील पालम रोड धानोरा काळे येथील रस्त्याच्या कामाची थकीत रक्कम अदा करण्याबाबत

(३१) ४५४१६ (२५-०९-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील पालम रोड धानोरा काळे येथील अंदाजित साडेआठ किलोमीटरच्या रस्त्याचे काम करुन रस्त्याच्या कामाची थकीत रक्कम मिळत नसल्यामुळे श्री.राजू चिन्नापा मरगुंडे यांनी पत्नीसह मंत्रालयासमोर आत्मदहनाचा प्रयत्न केल्याची घटना माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.मरगुंडे यांनी रस्त्याच्या केलेल्या कामांची रक्कम रु.१ कोटी ७० लाख असून त्यापैकी केवळ १४ लाख रुपयांची रक्कम त्यांना देण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१२-१०-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे. तथापि, पालम रोड धानोरा काळे हा रस्ता नांदेड जिल्हयातील नसून, परभणी जिल्हयातील आहे. तसेच, आत्मदहनाचा प्रयत्न केलेल्या व्यक्तिचे नाव श्री. राजु चुन्नाप्पा हुलगुंडे असे आहे. प्रस्तुत काम हे श्री. हुलगुंडे यांनी केलेले नसून, त्यांचे नावे कोणतेही देयक प्रलंबित नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) होय. चौकशीमध्ये श्री. हुलगुंडे यांचे नावे कोणतेही देयक विभागाकडे प्रलंबित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या “पोलिस उपायुक्त” पदाच्या परिक्षेकरिता दुसरी संधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(३२) ४५४३१ (२५-०९-२०२२). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माटुंगा स्टेशन जवळ रेल्वे अपघात झाल्यामुळे संपूर्ण रेल्वे वाहतूक विस्कळीत झाल्याने दिनांक १६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास “ पोलीस उपायुक्त” पदासाठी परिक्षेस जाणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर पोचण्यास विलंब झाला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास रेल्वे अपघातामुळे विलंब झालेल्या विद्यार्थ्यांना परिक्षेकरीता दुसरी संधी उपलब्ध करुन देण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२१-१०-२०२२) : (१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शनिवार, दि.१६एप्रिल,२०२२ रोजी आयोजीत ही परीक्षा पोलीस उपायुक्त पदाची नसून पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा पूर्व परीक्षा २०२१ अशी होती. सदर परीक्षेच्या दिवशी मांटुगा स्टेशन जवळ रेल्वे अपघातामुळे रेल्वे वाहतूक विस्कळीत झाल्याने परीक्षा उपकेंद्रावर पोहोचणे शक्य झाले नाही. अशी निवेदने काही उमेदवारांकडून आयोगास प्राप्त झाली आहेत.

(२) महाराष्ट्र लोकसेवा आयोग सांविधानिक दृष्ट्या स्वायत्त संस्था असून आयोगामार्फत परीक्षा प्रक्रिया राबविण्याचे धोरण ठरविले जाते. त्यामध्ये शासन स्तरावरुन कोणताही हस्तक्षेप केला जात नाही.

आयोगाच्या सर्वसाधारण सुचनानुसार परीक्षांसाठी निर्धारित वेळेपूर्वी परीक्षा उपकेंद्रावर उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक आहे. परीक्षेचे संवेदनशील स्वरुप व परीक्षा एकाच वेळी सर्व केंद्रांवर सुरु होण्याची बाब विचारात घेता आयोगाकडून नेहमीच सर्व परीक्षांना उमेदवारांच्या प्रवेशाची वेळ काटेकोरपणे पाळण्यात येते. परीक्षा सुरु झाल्यानंतर पूर्वघाषित वेळेमध्ये कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही कारणास्तव सवलत देण्याचे/ बदल करण्याचे अधिकार नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पेण, (जि. रायगड) तालुक्यातील रस्ते वाहतुकीच्या दृष्टीने दर्जोन्नत बांधण्याबाबत

(३३) ४५५०३ (२१-०९-२०२२). श्री.रविशेठ पाटील (पेण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ता.पेण जि. रायगड, मध्ये रा.म.मा.६६ ते वडखळ बोरीशिर्की रस्ता, इतर जिल्हा मार्ग क्र.५४ व शिर्की ते बोर्वे मसद (खु) ते शिर्कीचाळ नं.२ रस्ता ग्रा.मा.क्र.२८ हे दोन्ही मार्ग वाहतुकीच्या दृष्टिने महत्वाचे आहेत,हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सदरील दोन्ही रस्ते ३.०० मीटर इतक्या अरूंद धावपटटीचे असून त्याची दूरवस्था झाली असल्याने वाहतुकीस अपुरे पडत आहेत हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, या मार्गावरून वडखळ, डोलवी भागातील जे.एस.डबल्यू. सारख्या मोठया औद्योगिक कंपन्यांची तसेच सागरी मार्गावरून ये जा करणाऱ्या वाहनांची मोठया प्रमाणात वर्दळ असते हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, सदरचा मार्ग प्र.जि.मा.केल्यास पर्यटन, शेती व्यवसाय, औद्योगिक व सागरी माल वाहतुकीच्या दृष्टिने सोयीस्कर होण्यास मदत होणार असल्याने दर्जोन्नत करण्याची मागणी आहे, हे ही खरे आहे काय.

(५) असल्यास, सदरचा मार्ग प्र.जि.मा.म्हणून दर्जोन्नत करणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री,सार्वजनिक बांधकाम, यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय.

(६) असल्यास, सदरचा मार्ग प्र.जि.मा.म्हणून दर्जोन्नत करण्यासाठी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (२१-१०-२०२२) : (१),(२), (३), (४) व (५) होय. हे खरे आहे.

(६) सदरचा मार्ग प्र.जि.मा. म्हणून दर्जोन्नत करणेची बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

भोसे ते पटवर्धन कुरोली (ता.पंढरपूर जि.सोलापूर) या रस्त्याचे प्रलंबित काम पूर्ण करण्याबाबत

(३४) ४५७७४ (२५-०९-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पटवर्धन कुरोली (ता.पंढरपूर जि.सोलापूर) येथील भोसे ते पटवर्धन कुरोली या रस्त्याचे काम मागील अकरा वर्षापासून प्रलंबित असल्याची बाब माहे मे,२०२२ रोजी मध्ये वा त्या निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पटवर्धन कुरोली ते भोसे ह्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतुक होत असल्याने रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली आहे हे खरे आहे काय

(३) असल्यास, सदर रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढत असून शेकडो विद्यार्थी आणि ग्रामस्थांना या मार्गावरुन प्रवास करावा लागत असतानाही रस्ता दुरुस्ती न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार सदर प्रलंबित काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१४-१०-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्नांकित ११.५ कि.मी. लांबीपैकी ६.५ कि.मी. लांबीमध्ये रक्कम रु.३०० लक्षचे डांबरीकरण व मजबुतीकरणाचे मंजुर काम प्रगतीत आहे.उर्वरित लांबीत वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत मंजुर कामामधुन रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बांद्रा-कुर्ला संकुल ते सी.एस.टी.एम. मार्ग यांना जोडणाऱ्या डी.पी. मार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(३५) ४५९३३ (२७-०९-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बांद्रा-कुर्ला संकुल ते सी.एस.टी.एम. मार्ग यांना जोडणाऱ्या प्रस्तावित ३० मी.रुंद डी.पी. मार्गाचे काम प्रलंबित राहिल्या बाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्या दरम्यान तत्कालीन पालकमंत्री मुंबई उपनगर जिल्हा तथा पर्यटन, पर्यावरण मंत्रीमहोदय व संबंधित मंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार केला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनीं दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१९-१०-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर रस्त्याचे ९० टक्के काम पूर्ण झालेले असून उर्वरित लांबीत बाधीत होत असलेले अतिक्रमण हटविण्याची व जमीन अधिग्रहणाची प्रक्रीया अंतिम टप्प्यात असून, उर्वरित लांबीतील रस्त्याचे काम पूर्ण करुन सदर रस्ता वाहतूकीसाठी खुला करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे नियोजन आहे.

मुळशी , भोर, वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील मोठया पुलांच्या कामांना नाबार्ड योजनेतंर्गत मंजूरी मिळण्याबाबत

(३६) ४५९५८ (२५-०९-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील रा.मा.१०६ ते कोदवडी आसनी ट्रामगुडा रस्ता ग्रा.मा. ७ वर कानंदी नदीवर मोठया पूलाचे बांधकाम , मुळशी तालुक्यातील प्रजिमा २७ ते वांजळे ग्रा.मा. ६६ वर मुठा नदीवर मोठया पूलाचे बांधकाम, आणि प्रजिमा २६ ते वाळेण रस्ता ग्रा.मा. ३९ वर मोठया पूलाचे बांधकाम, भोर तालुक्यातील ग्रा.मा. २ वर शिवगंगा नदीवर शाळवडे गावाजवळ मोठया पूलाचे बांधकाम करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय ?
(२) असल्यास, या मोठया पूलांच्या कामांना नाबार्ड २८ योजनेअंतर्गत मंजूरी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक ७ एप्रिल, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनानेचौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने निर्णय घेवून व निधीची तरतूद करुन सदर पूलांच्या बांधकाम प्रकरणी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (०१-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) विषयांकित काम हे निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहिल.

ठाणे शहरातील मैदाने विकसित करण्याबाबत

(३७) ४६१७० (२५-०९-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील माजिवडे येथील भुखंड क्र.७ सेक्टर ४ हे भुखंड खेळाच्या मैदानासाठी आरक्षित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे महानगर पालिकेच्या दुर्लक्षामुळे हे मैदान खेळाडूंसाठी गैरसोयीचे ठरले असून गेल्या अनेक वर्षापासून मनपाकडून या मैदानाची अवस्था सुधारण्यासाठी नियोजन केले नसल्याने मैदानावर दगड, वाढलेली झाडे, मैदानावर पडलेले राडा रोडा (डेब्रिज) असून या परिसरात राहणारे झोपडपट्टीवासीय सदरहू मैदानाचा गैरवापर करीत असल्याचा आरोप ठाणे सिटिझन्स फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेने केला असल्याचे दिनांक २५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे का,
(३) असल्यास, ठाणे शहरातील १२ मैदानांचा विकास करून २ कोटी रुपये निधी खर्च प्रस्ताव तयार केला असून, सदरहू प्रस्तावावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(४) असल्यास, त्यानुषंगाने मैदानांचा तातडीने विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-११-२०२२) : (१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मौजे माजिवडा येथील सेक्टर-४ मधील सर्वे क्र. १८८, १८९ पै., १९२ पै., ३६५ पै. या भुखंडावर ठाणे शहराच्या मंजूर विकास आराखड्यानुसार खेळाचे मैदान आरक्षण क्र. ७ दर्शविण्यात आल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.
(२) अशा प्रकारचे निवेदन ठाणे महानगरपालिकेकडे प्राप्त झाले आहे.
(३) ठाणे शहरातील १२ मैदानांचा विकास करण्याकरिता रु. १.८४ कोटीच्या प्रस्तावास महानगरपालिका स्तरावर प्रदान करण्यात आलेल्या मंजूरीनुसार दिनांक २१.१२.२०२० रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर कामांतर्गत अस्तित्वातील मैदानांचे नुतनीकरण करण्यात येणार आहे.
(४) ठाणे महानगरपालिकेने शहरातील १२ मैदानांच्या नुतनीकरणाकरीता रु. १.८४ कोटी खर्चाच्या प्रस्तावास सन २०१९ मध्ये मंजूरी प्रदान केली आहे.

तसेच मौजे माजीवाडा येथील सेक्टर ४ मधील आरक्षण क्र. ७ नुसार दर्शविण्यात आलेले मैदान विकासित करणेकरीता रु. ४.७९ कोटी चे सविस्तर अंदाजखर्च तयार केले असून सदर मैदान विकास कामाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही प्रस्तावित असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी महानगरपालिका (जि.ठाणे) प्रशासनाने कचरा ठेकेदारास
महानगरपालिकेची वाहने उपलब्ध करुन दिल्याबाबत

(३८) ४६१७८ (२८-०९-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी महानगरपालिका प्रशासनाने शहरातील जमा होणारा कचरा गोळा करण्याकरिता नेमलेल्या ठेकेदाराला

महानगरपालिकेच्या मालकीची कोटयवधी रुपयांची वाहने नाममात्र वार्षिक एक रुपया भाडेपट्टयावर देण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच डम्पिंग ग्राऊंडवर असलेला वजन काटा मागील कित्येक वर्षे नादुरुस्त आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-११-२०२२) : (१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत वाहने भाडेपट्ट्यावर देण्याची निविदा नसून कचरा संकलन सेवेच्या निविदेमध्ये टिपींग फी कंत्राटदारास देय ठरते.

घनकचरा संकलन व वहन या कामाचा कालावधी ६ वर्षे असून महानगरपालिकेच्या मालकीची वाहने वार्षिक भाडेतत्वावर उपलब्ध करुन दिल्यास महानगरपालिकेस वाहनाकडून मिळणारे भाडे व प्रति टनामागे टिपींग फी चे कमी दर निश्चित होऊन त्याद्वारे महानगरपालिकेची आर्थिक बचत होत असल्याची बाब भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविली आहे.
(२) व (३) सन २०११-१२ मध्ये शहरातील नागरिकांच्या घरी जाऊन कचरा गोळा करण्यासाठी प्रति टन याप्रमाणे निविदा मागवून शहरातील गोळा झालेल्या कचऱ्याचे वजन करण्याकरीता करारनामा करण्यात आला असून त्यानुसार वजन काटा उभारण्याची कार्यवाही संबंधित ठेकेदाराने करावयाची आहे.

या अटीनुसार उपरोक्त कालावधीत ठेकेदाराकडून वे ब्रिज उभारण्यात आले होते. परंतु स्वच्छता विषयकाच्या कामाच्या वाढत्या तक्रारी विचारात घेऊन सन २०१४ मध्ये सदर ठेका रद्द करण्यात आला असून तेथे उभारण्यात आलेला वे ब्रिज अस्तित्वात नसल्याची बाब भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्हयातील दाताळा ते लालमाती पाडळी या मार्गावरील रस्त्याची झालेली दुरवस्था

(३९) ४६५१२ (२५-०९-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील दाताळा ते लालमाती पाडळी या मार्गावरील रस्त्याचे डांबरीकरण झाले नसल्याचे माहे जुन, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील अनेक वर्षापासून उक्त रस्ता अतिशय खराब असल्याने वाहनधारकांना त्रास होत असून पोफळी ते तपोवन फाटा या मार्गावरील ४ किमी अंतराचे डांबरीकरण झाले नसल्याने हे काम त्वरीत करण्यात यावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (२१-१०-२०२२) : (१) हे खरे नाही,
दाताळा लालमाती पाडळी रस्त्याचे कि.मी. ०/०० ते १८/०० व कि.मी. २३/०० ते २५/०० या लांबीचे डांबरीकरण मे, २०२२ मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे.
(२) व (३) कि.मी. १८/०० ते २३/०० या लांबीतील पृष्ठभाग खराब असल्याने सदर लांबीतील खड्डे भरुन रस्ता सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. तसेच सदर लांबीची सुधारणा व रुंदीकरणाचे काम ऑगस्ट, २०२२ चे पुरवणी अर्थसंकल्पात मंजुर असून, सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम त्वरीत सुरु करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

गोंदिया जिल्हयातील केशोरी ते लाखांदूर रस्त्याचे काम
निधी उपलब्ध नसल्यामुळे अपुर्णावस्थेत असल्याबाबत

(४०) ४६६४० (२३-०९-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील प्रमुख जिल्हामार्ग क्र. ४१ केशोरी ते लाखांदूर रस्त्याचे काम सन २०१८ पासून सुरु असून वडेगाव ते पुयार रस्त्याचे काम अपुर्णावस्थेत असल्याने रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८ मध्ये सदर प्रमुख जिल्हा मार्गाचे काम सुरु झाले असले तरी काम पूर्ण करण्यासाठी मागील तीन वर्षात पुरेसा निधीच उपलब्ध करुन देण्यात न आल्यामुळे कंत्राटदारांनी कामे बंद केली आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तेथील नागरीकांनी व संबंधित लोकप्रतिनिधीनी संबंधित यंत्रणेकडे मागणी केली आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित विभागाने हा रस्ता लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (१८-१०-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) रस्त्याचे काम विहीत कालावधीत पुर्ण करण्यात आले आहे.

पेण, जि.रायगड येथील समुद्र व खाडी लगतच्या गावांमध्ये पाणी घुसून
शेतीचे व घरांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाल्याबाबत

(४१) ४७०३८ (२१-०९-२०२२). श्री.रविशेठ पाटील (पेण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ता.पेण, जि.रायगड येथील समुद्र व खाडी लगतच्या मौजेरावे, दादर, कळवा, सोनखार, भाल, वढाव, दिव, कोलोटी, वाशी, काळेश्री, वरेली, कोळवे, गडब, आमटेम, खारपाली, पांडापुर, निगडे, नारवेल-बेनवले, मसद व शिर्की या खाडी व समुद्रालगतच्या गावांमध्ये मोठया उधाणच्या भरतीमुळे व औद्योगिक कंपन्यांच्या जहाज जलवाहतुकीमुळे पाणी घुसून शेतीचे व घरांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाल्याचे दिनांक ६ जून, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पत्तन विभागामार्फत याची दक्षता वा नोंद घेण्यात येत नाही हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, खाडी व समुद्राचे पाणी शिरून शेतीचे व घरांचे नुकसान टाळण्यासाठी सुंरक्षित बंधारे बांधण्यासाठी पत्तन विभागामार्फत कोणती उपाययोजना करण्यात येत आहे वा येणार आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (२०-१०-२०२२) : (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) सदर कामांमधील दादरगांव येथे वशेणी हायवे ते रामआळी येथे धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्याचे रु.२,४७,५०,०००/- अंदाजित किंमतीचे काम सन २०२२-२०२३ चे अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आले आहे. सदर कामाचे संकल्पन तयार करणेसाठी केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (CWPRS), खडकवासला, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कराडा-विटा (जि.सांगली) रस्त्यांचे सुर्ली घाटामधील चौपदरीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(४२) ४७७३१ (२१-०९-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर): सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराडा-विटा (जि.सांगली) रस्त्यांचे चौपदरीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम सुरु असून धोकादायक असलेल्या सुर्ली घाटामधील रस्त्यांचे काम १६६ ई प्रमाणे करण्यासाठी पाणी संघर्ष समिती व हिंद केसरी फाऊंडेशनच्यावतीने माहे एप्रिल, २०२२ रोजी वा त्या दरम्यान आंदोलन करण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (२५-१०-२०२२) : (१) होय.

(२) याबाबत शासनाने चौकशी केली आहे. त्याअनुषंगाने घाटरस्ता वन विभागाच्या हद्दीत येत असल्याने कॉंक्रिट काम अथवा अस्तित्वातील रस्त्याव्यतिरिक्त बदल न करण्याचे व डांबरीकरण करण्याबाबत परवानगी मा.मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांनी दि.०८.०९.२०२२ च्या पत्रान्वये दिलेली आहे.

(३) वन विभागाने कळविल्याप्रमाणे मुळ कामाच्या वावामध्ये मंजुर असलेल्या वन हद्दीमधील कॉंक्रिटचा रस्ता तयार करता येत नसल्याने अस्तित्वातील रुंदीमध्ये डांबरीकरण करण्याची परवानगी असल्यामुळे मुळ कामाच्या वावामध्ये बदल करण्यात आला व सदर सुधारित प्रस्ताव तयार करुन प्रादेशिक अधिकारी,रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय,कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडे दि.२०.०९.२०२२ रोजी सादर केला आहे. रस्ते वाहतुक मंत्रालय यांच्याकडून प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर डांबरीकरणाचे काम करण्यात येणार आहे. तोपर्यंत घाट रस्त्याचे खड्डे डांबराने बुजविण्यासाठी वेळोवेळी काम करण्याबाबत ठेकेदारास निर्देशित करण्यात आले आहे.

राज्यातील ओबीसी, विमुक्त जाती व भटक्या जमातीना शासकीय सेवेत आरक्षण देण्याबाबत

(४३) ४७७३७ (२३-०९-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय नोकऱ्यांमध्ये ओबीसी, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या १६ हजार पदांचा अनुशेष बाकी असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रवर्गाला नोकऱ्यांमध्ये पूर्ण आरक्षण मिळण्याच्यादृष्टीने पदाचा अनुशेष केव्हापर्यात भरण्यात येणार आहे, व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, शासनाने या प्रवर्गातील नोकऱ्यांमधील अनुशेष भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२८-१०-२०२२) : (१), (२) व (३) सर्व प्रशासकीय विभाग व त्या विभागांच्या अधिनस्त कार्यालयांमधील गट -अ, ब, क व ड संवर्गातील अनुशेषाबाबतची माहिती पाठविण्याबाबत त्या त्या विभागांकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. सर्व प्रशासकिय विभागांकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर त्याआधारे अनुशेषाच्या एकूण पदांची निश्चितता स्पष्ट होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई व केज (जि.बीड) येथील मंजूर असलेल्या लेखाशीर्षाऐवजी दुसऱ्या लेखाशीर्षा मधून देयकाचा झालेला गैरव्यवहार

(४४) ४८०७९ (२५-०९-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई व केज (जि.बीड) तालुक्यातील सन २०१४- २०२१ या कालावधीत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई या कार्यालयामार्फत विविध कामांवर खर्च केला असून मंजूर असलेल्या लेखाशीर्षाऐवजी दुसऱ्या लेखाशीर्षा मधून देयके देण्यात आलेली आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांनी मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याने सन २०१४-२०१९ या कालावधीतील खर्च करण्यात आलेल्या निधीची माहिती देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांना दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, लोकप्रतिनिधी यांना माहिती उपलब्ध करून न दिल्याबाबत संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केजी वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (१२-१०-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने, चौकशीअंती कोणतीही अनियमितता झाली नसल्याबाबत दि. १५.७.२०२२ च्या पत्रान्वये संबंधित लोकप्रतिनिधींना कळविण्यात आले आहे. तसेच, लोकप्रतिनिधींच्या पत्राला उशिरा माहिती दिल्याच्या अनुषंगाने संबंधितांचा खुलासा मागविण्यात आला आहे.

नांदगाव (जि.नाशिक) शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील गंगाधरी शिवारात बसविलेले पथदिवे बंद असल्याबाबत

(४५) ४८२५७ (२५-०९-२०२२). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (जि.नाशिक) शहरातून जाणा-या राष्ट्रीय महामार्गक्र.७५३ चे काम पूर्ण होऊन एक वर्षाचा कालावधी उलटून गेला तरीही या महामार्गावरील गंगाधरी शिवारात बसविलेले पथदिवे अद्यापही बंद अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गावरील पथदीव्याकरीता विज जोडणी कोणाचे नावावर करण्याच्या मुद्यावरुन राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, नाशिकच्या संबंधित अधिका-यांकडून टोलवाटोली करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पथदीवे बंद अवस्थेत ठेवण्यास जबाबदार असणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली आहे व सदर मार्गावरील पथदीवे तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (२५-१०-२०२२) : (१) नाही.

सद्यस्थितीत राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३ जे वरील गंगाधरी शिवारात बसविलेले पथदिवे नियमित चालू आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी (जि.ठाणे) शहरातील मौजे चाविंद्रा येथील मोकळ्या भूखंडावर अनधिकृतपणे सुरू असलेले डंम्पिग ग्राऊंड बंद करण्याबाबत

(४६) ४८४७५ (२८-०९-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि. ठाणे) शहरातील मौजे चाविंद्रा येथे सिटी पार्कसाठी आरक्षित असलेल्या मोकळया भूखंडावर अनधिकृतपणे सुरू असलेले डंम्पिग ग्राऊंड बंद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ मे २०२२ रोजी मा.आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांना निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने महानगरपालिका व प्रशासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-११-२०२२) : (१) अशा प्रकारचे निवेदन महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका स्तरावर खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत असल्याची बाब कळविली आहे:-

* मौजे चाविद्रा येथील स्मशानभूमीच्या जागेमध्ये वे-ब्रिज उभारण्याचे काम रद्द करण्यात आले असून त्यासाठी पर्यायी जागा शोधण्यात आली आहे.

* नवीन विकास योजने अंतर्गत क्षेपण भूमीसाठी जागा उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरु आहे.

* मौजे चाविद्रा येथील कचरा रिकामा करण्याकरीता जुन्या कचऱ्यापैकी १,३९,११० क्युबिक मी. कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्यात आली असून ४६२१७८.१४ मे. टन कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया प्रस्तावित करण्यात आली आहे.

* भिवंडी निजामपूर शहरातील दैनंदिन स्वरुपात कचऱ्याची विल्हेवाट लावणे अंतर्गत पर्यायी जागा म्हणून शासकीय जागेसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

* कचऱ्याच्या विल्हेवाटीकरीता कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत वेस्ट टू एनर्जी प्रकल्प क्लस्टर पध्दतीने राबविला जाणार असून त्यामध्ये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सहभागी होणे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य म्हणून शासकीय सेवेत नोकरीस लागलेल्या पाल्यांना शासन सेवेत कायम करण्याबाबत

(४७) ४८७१६ (२३-०९-२०२२). श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य म्हणून शासकीय सेवेत नोकरीस लागलेल्या पाल्यांची सेवा समाप्त करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, औरंगाबाद व जिल्हाधिकारी, जालना यांनी दिले आहेत ही बाब दिनांक ७ मे, २०१९ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य म्हणून शासकीय सेवेत नोकरीस लागलेल्या पाल्यांचे नामनिर्देशन पत्रातील नातेसंबंधाबाबतीत स्वातंत्र्य सैनिकांनी त्यांचे अधिकार स्वेच्छेने पाल्यांना नामनिर्देशित केले असल्यामुळे स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शासन सेवेत कायम ठेवण्याबाबत स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यानी मा.सामान्य प्रशासन विभागाचे राज्यमंत्री यांना दिनांक ७ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन सेवेतून कमी केलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून पुन्हा सेवेत रुजू करुन घेण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) असल्यास उक्त प्रकरणी चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२८-१०-२०२२) :(१) होय.
(२) स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांनी सेवेत कायम ठेवणेबाबत तत्कालिन मा.राज्यमंत्री (सामान्य प्रशासन) यांना दिलेले निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) व (४) सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१०.१.१९८५, दि.१२.२.१९८८ व दि.६.८.२००४ रोजीच्या शासन निर्णयांन्वये स्वातंत्र्य सैनिकांनी शासकीय सेवेकरिता कोणत्या नातेवाईकाचे नामनिर्देशन करावे याबाबतच्या तरतूदी स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार स्वातंत्र्य सैनिकांनी नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.

तथापि, काही व्यक्तींनी बनावट नामनिर्देशनाच्या आधारे शासकीय सेवेत नियुक्ती मिळविली होती. सदर नियुक्त्यांविरोधात मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.८००९/२०१४ प्रकरणी न्यायालयाने दिनांक २५.२.२०१९ रोजी ४८ नामनिर्देशित व्यक्तींच्या सेवा समाप्त करण्याचे आदेश दिले आहेत. सदर न्यायनिर्णयानुसार स्वातंत्र्य सैनिक पाल्य म्हणून शासन सेवेत नियुक्ती मिळविलेल्या पाल्यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

केज (जि. बीड) येथील पाझर तलावांच्या देखभाल व दुरुस्तीसह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(४८) ४८७२० (२३-०८-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि. बीड) येथील ९९ पाझर तलावांची कामे सन-१९९३-९४ मध्ये करण्यात आली असून सदर तलावांची जवळपास ३० वर्षा पेक्षा जास्त कालावधीत कोणतीही देखभाल व दुरुस्ती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाझर तलावांचे भराव काम दबणे, झाडे-झुडपे उगविल्याने तसेच काही तलावांचे पूर्वीचे काम दगडी संधानकात केले असून काही तलावाचे संधानक जीर्ण झाले असून पाण्याची गळती होत असून प्रत्येक मान्सून मध्ये सदर पाझर तलावांवरून पाणी वाहून व भराव काम वाहून जात असल्याने तलावांच्या खालील बाजूस असलेल्या शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तलावांच्या भरावाचे माती काम, दगडी अश्मपटलाचे काम, सांडवा दुरुस्तीचे काम, तलावाच्या भरावावरील झाडे- झुडपे काढण्याकरीता त्वरित अंदाजपत्रके करून मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तदनुसार उक्त तलावांची देखभाल व दुरुस्ती तसेच सदरहू कामांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१७-११-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

या विभागांतर्गत पावसाळी हंगामात क्षतिग्रस्त झालेली व दुरुस्ती आवश्यक तलावांचे दुरुस्ती कामे वेळेत हाती घेण्यात आलेली आहेत. त्यामुळे पावसाळा हंगामात पाझर तलावावरून पाणी वाहून व भराव काम वाहून गेल्यामुळे तलावांचे खालील बाजूस शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान झालेले नाही.
(३) हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे दि.३१/०३/२०२२ रोजी सादर केलेल्या निवेदनातील मागणीचे यादीतील एकुण १८ कामे या विभागाशी संबंधीत असून, त्यापैकी क्षतिग्रस्त झालेली व दुरुस्ती आवश्यक असलेले २ कामे जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत पुर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरित १६ कामांपैकी दुरुस्ती आवश्यक असलेल्या ४ कामांचा समावेश मा.मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेतंर्गत करण्यात आलेला आहे.

(४) केज (जि.बीड) विधानसभा मतदारसंघात या विभागाच्या अंतर्गत २८० पाझर तलाव, गाव तलाव आहेत. त्यापैकी अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेले व दुरुस्ती आवश्यक असलेले ३६ तलावांची दुरुस्ती पुर्ण झालेली असून १५ तलावांची दुरुस्ती प्रगतीपथावर आहे. ७८ तलाव दुरुस्त करणे आवश्यक असून निधीच्या उपलब्धतेनुसार सदरील तलाव दुरुस्त करून घेण्यात येतील.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

वासंबा फाटा (जि. हिंगोली) येथील राष्ट्रीय महामार्गावर उड्डाणपुल उभारण्याबाबत

(४९) ४९००८ (२५-०९-२०२२). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वासंबा फाटा (जि. हिंगोली) येथील राष्ट्रीय महामार्गावर उड्डाणपुल उभारला नसल्याने येथील प्रवास अतिशय धोकादायक झाला असून या महामार्गावर ग्रामस्थांनी रस्ता रोका केला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आंदोलनामुळे जवळपास हजारो वाहनाच्या रांगा दोन्ही बाजूला लागल्यामुळे नागरीकांना अनेक तास वाहनात अडकुन पडावे लागले होते हे खरे काय,
(३) असल्यास, वासंबा फाटा येथील राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपूल तात्काळ उभारण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (१३-१०-२०२२) : (१) वाशिम ते पांगरे ता.जि.हिंगोली पर्यंतच्या राष्ट्रीय महामार्ग क्र.१६१ चे चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत करण्यात आले आहे. स्थानिक नागरिकांनी दि.२६.०४.२०२२ रोजी बासंबा फाटा येथे उड्डाणपुलाच्या मागणीसाठी रास्तारोको आंदोलन केले होते.
(२) अंशत: खरे आहे, तथापी पोलीस आणि महसुल प्रशासनाने तात्काळ रस्ता वाहतुकीस मोकळा केला होता.
(३) कंत्राटदाराच्या करारानुसार बासंबा फाटा कि.मी.१२०/१०० येथे चौपदरीकरण तसेच टी जंक्शन IRC मानकानुसार तयार करण्यात आले असून सदर रस्ता वाहतुकीसाठी सुरु करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चिपळूण (जि. रत्नागिरी) येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील
कनिष्ठ अभियंता पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याबाबत

(५०) ४९०५४ (२५-०९-२०२२). श्री.शेखर निकम (चिपळूण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील सार्वजनिक बांधकाम विभागात कनिष्ठ अभियंत्याची ३० पदे मंजूर असून त्यापैकी १९ पदे कार्यरत असून ११ पदे रिक्त असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कार्यालयांतर्गत उपविभागत मोठ्या प्रमाणात अर्थसंकल्पीय नाबार्ड, ५०५४-०३, ५०५४-०४ ची कामे, २५१५ ग्राविका, सरोसर संवर्धन, अेएमसी, एस.आर, एफडीआर, गट - क, गट - ब, खासदार स्थाविका, जिल्हा वार्षिक योजना इत्यादी योजनेअंतर्गत कामे मंजूर असून त्यातील काही कामे निवीदा स्तरावर केली जात आहेत हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामांचे अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देऊन निविदेकरीता परिपूर्ण माहिती सादर करणे, तसेच शासनाकडून वेळोवेळी येणारी माहिती अद्ययावत करुन शासनास सादर करणे, यामुळे कार्यरत शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता यांच्याकडून विहीत वेळेत काम करणे शक्य होत नाही हे ही खरे आहे काय.
(४) असल्यास, कनिष्ठ अभियंताची रिक्त पदे भरल्यास त्यांचा अतिरिक्त कार्यभार अन्य शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता यांच्यावर न येता मोठ्या प्रमाणात कामाचा निपटारा जलद गतीने होईल, हे ही खरे आहे काय,

(५) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (२०-१०-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे,

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.२५.११.२००४ च्या आकृतीबंधानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण अंतर्गत कनिष्ठ अभियंता संवर्गाची एकूण ३० पदे मंजूर असून त्यापेकी १८ पदे भरलेली असून उर्वरीत १२ पदे रिक्त आहेत.

(२) होय.

(३),(४) व (५) हे अंशत: खरे आहे,

वित्त विभाग, शासन निर्णय दि.०४.०५.२०२० अन्वये नवीन पदभरतीवर निर्बंध होते. तसेच, वित्त विभाग, शासन निर्णय दि.३०.०९.२०२२ अन्वये ज्या प्रशासकीय विभागांनी वित्त विभागाच्या दि.११.०२.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सुधारित आकृतीबंध अंतिम मंजूर केले आहेत, अशा सुधारित आकृतीबंधातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे वगळता अन्य ५०% पदे भरण्यास अनुमती देण्यात आली आहे. त्यानुसार, सार्वजनिक बांधकाम विभागाचा (स्थापत्य) शाखेचा आकृतीबंध सुधारित करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे निर्बंध शिथिल करुन पद भरण्याची कार्यवाही ही सुरु आहे.

विधान भवन :
नागपूर.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.